# राजर्षी शाहू महाविद्यालय, लातूर

## (स्वायत्त महाविद्यालय)

# राष्ट्रीय सेवा योजना

# नियमित कार्यक्रमाचा अहवाल

## 2016-17

# राजर्षी शाहू महाविद्यालय, लातूर
## राष्ट्रीय सेवा योजना

## दि. ०१.०५.२०१६ ते ३१.०३.२०१७

शैक्षणिक वर्ष २०१५-१६ च्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या समन्वय समितीची बैठक दि. रोजी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस.बी.जाधव यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली. या बैठकीत खालील ठराव चर्चा करुन मंजूर करण्यात आले.

१) या वर्षाच्या प्रवेश प्रक्रियेस मंजूरी देण्यात आली.

२) मागील वर्षाच्या कार्यक्रमाबद्दल आढावा घेण्यात आला.

३) गरीब विद्यार्थी निधी संकलन करण्याचे ठरले.

४) या वर्षाच्या कार्यक्रमाच्या आयोजनाबाबत चर्चा करण्यात आली.

विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास घडवून आणण्यासाठी महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेचा विभाग सतत कार्यरत असतो. या विभागाच्यावतीने विद्यार्थ्यांचा व्यक्तिमत्व विकास, श्रमप्रतिष्ठा आणि सामाजिक कार्याची जाणीव निर्माण करुन देण्याचे काम हा विभाग सतत करत आलेला आहे. शैक्षणिक वर्ष २०१६-१७ मध्ये कनिष्ठ स्तरावर १०० विद्यार्थी स्वंयसेवकांची संख्या मंजुर करण्यात आलेली आहे. तर राष्ट्रीय सेवा योजना अ २ स्तरावरील प्रतिनिधी म्हणून कु.राजश्री इंद्रजित पिटले हिची निवड करण्यात आलेली आहे. या विभागाच्यावतीने वर्षभरात विद्यार्थ्यांकडून विविध उपक्रम राबविण्यात येतात.

त्यामध्ये प्रामुख्याने स्वच्छता अभियान, लोकमान्य टिळक पुण्यतिथी व अण्णा भाऊ साठे जयंती, जागतिक राष्ट्रीय सेवा योजना दिन, पर्यावरण संवर्धन, प्लस पोलिओ अभियान, एड्स विरोधी जनजागरण रॅली, पोलीस रेझिन डे, रस्ता सुरक्षा अभियान सप्ताह, पर्यावरण संवर्धन, एकता दौड, गांधी जयंती, जागतिक योगा दिन, विशेष युवक शिबिर, स्वामी विवेकानंद व राजमाता जिजाऊ जयंती, क्रांती दिन, स्वातंत्र्य दिन, मराठवाडा हैद्राबाद मुक्ति दिन, प्रजासत्ताक दिन, राष्ट्रीय युवक सप्ताह दिन, निसर्ग सहल आणि प्रजासत्ताक दिनानिमित्त कार्यक्रम व उपक्रम घेण्यात आले.

**०१. वार्षिक अनेवेक्षण कॅम्प :-**

शै.व.२०१५-१६ चे अनवेक्षणाचा जिल्हास्तरी कॅम्प राजर्षी शाहू महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या विभागाने विद्यापीठाच्या सूचनेनूसार १८ मे रोजी आयोजित करण्यात आला. या कॅम्पचे उद्घाटन महाविद्यालयाचे डॉ. एस.डी. साळुंके यांच्या हस्ते झाले. याप्रसंगी लातूर जिल्ह्यातील सर्व महाविद्यालयाचे कार्यक्रमाधिकारी, विद्यापीठ समन्वय डॉ. नागेश कांबळे, सी.ए. पाटील साहेब, महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ.महादेव गव्हाणे उपस्थित होते. या कॅम्पच्या आयोजनात कार्यक्रमाधिकारी डॉ. के.डी. सावंत आणि डॉ. पी.जी. कावळे यांनी विशेष परीश्रम घेतले.

**०२. आव्हान २०१६ :-**

आव्हान २०१६ जिल्हास्तरीय निवडप्रक्रीया दि. ०३ मे २०१६ रोजी राष्ट्रीय सेवा योजनेच्या विभागात प्राचार्य आर.एस.आवस्ती यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाले. या निवडप्रक्रीयेसाठी जिल्हा समन्वयक डॉ. पी.टी. पवार, कार्यक्रमाधिकारी

डॉ. के.डी. सावंत, डॉ.पी.जी. कावळे, प्रा.एस.एम.तलवारे, प्रा. व्ही.ए.गवळी इत्यादींनी परीश्रम घेतले.

०३. महाविद्यालयातर्फे अव्हान २०१७(सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ) कॅम्पसाठी खालील ०४ स्वंयसेवकांनी सहभाग नोंदवला.

१. श्री. खंडोबा शेल्लाळे

२. श्री. शुभम पारगावे

३. कु. सुजाता चव्हाण

४. कु. माधुरी जगताप

**०४. महात्मा जोतिबा फुले जयंती :**

दि.११ एप्रिल, २०१६ रोजी राजर्षी शाहू महाविद्यालयात उपप्राचार्य डॉ.एम.एच. गव्हाणे यांच्या अध्यक्षतेखाली महात्मा जोतीबा फुले यांची जयंती साजरी करण्यात आली.

याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून प्रा.डॉ.विजयकुमार करजकर यांनी विद्यार्थी, स्वंयसेवक यांना बहुमोल मार्गदर्शन केले.

**०५. स्वच्छ भारत अभियान :-**

दि.२६ जून, २०१६ रोजी छत्रपती शाहू महाराज जयंतीनिमित्त महाविद्यालयामध्ये रा.से.यो. च्या वतीने कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. याप्रसंगी छत्रपती राजर्षी शाहू महाराजांच्या प्रतिमेस पुष्पमाळा अर्पण करून अभिवादन करण्यात आले. तर याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एस.डी. साळुंके यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

**०६. सामाजिक समता न्याय दिन :**

शिव छत्रपती शिक्षण संस्था, राजर्षी शाहू महाविद्यालय आणि राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्यावतीने दि.२६ जून, २०१६ रोजी राजर्षी शाहू महाराजांच्या जयंतीचे औचित्य साधून सामाजिक समता न्याय दिन साजरा करण्यात आला. प्रमुख पाहुणे म्हणून शि.छ.शिक्षण संस्थेचे अध्यक्ष मा.खा.डॉ.गोपाळराव पाटील लाभले होते. प्रारंभी शाहू महाराजांच्या प्रतिमेस पाहुण्यांच्या हस्ते पुष्पाहार व पुष्पाजंलि अर्पण करण्यात आली. तर शाहू महाराजांच्या १४२ व्या जयंती प्रसंगी त्यांच्या कार्याविषयी मा.खा.डॉ.गोपाळराव पाटील यांनी गौरवोद्गार काढले. याप्रसंगी संस्थेचे सदस्य प्रा.एम.एस.देशमुख, प्राचार्य व सदस्य डॉ.आर.एल.कावळे, श्री शिवाजी भोसले,श्री उद्धव पाटील, श्री आनंद माने, डॉ.शेखर गरड, श्री गोपाळ शिंदे, श्री महादेव मुळे, श्री धर्मराज हल्लाळे, श्री प्रकाश देशमुख इत्यादी संस्था सदस्य उपस्थित होते. याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एस.डी.साळुंके, उपप्राचार्य डॉ.पी.एन.सगर, उपप्राचार्य डॉ.एम.एच. गव्हाणे, उपप्राचार्या श्रीमती एम.एम. दुरुगकर यांची प्रमुख उपस्थिती होती.

**०७. लातूर वृक्षलागवड उपक्रम :**

दि.०१ जुलै, २०१६ रोजी राज्यभरात दोन कोटी वृक्ष लागवडीची मोहीम हाती घेण्यात आली. या मोहिमेचा भाग म्हणून अनेक सामाजिक संस्था व शैक्षणिक संस्था मोठ्या प्रमाणात सहभागी झाल्या होत्या. या उपक्रमात सकाळी टाऊन हॉल मैदानावर माजी अर्थमंत्री आमदार दिलीपराव देशमुख यांच्या हस्ते विविध सामाजिक संस्था, शैक्षणिक संस्था, राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वंयसेवक, राष्ट्रीय छात्र सेनेचे स्वंयसेवक यांना रोपांचे मोठ्या प्रमाणात वाटप करण्यात आले. या प्रसंगी लावलेल्या रोपांचे संवर्धन संगोपन करा असे आवाहन आमदान दिलीपराव देशमुख यांनी यावेळी केले. या प्रसंगी शाहू महाविद्यालयाच्या स्वंयसेवकांनी १५० ते २०० वृक्ष लागवड करुन या लातूर वृक्ष उपक्रमात हिरीरीने सहभाग नोंदवला.

**०८. गुरुपौर्णिमेनिमित्त विद्यार्थ्यांचे रक्तदान शिबिर :**

दि. १८ जुलै, २०१६ रोजी महाविद्यालयामध्ये रा.से.यो. च्यावतीने गुरु पौर्णिमेचे औचित्य साधून 'रक्तदान शिबिराचे' आयोजन करण्यात आले. याप्रसंगी कनिष्ठ महाविद्यालयाचे २० विद्यार्थी उपस्थित होते. तर वरिष्ठ महाविद्यालयातील ७८ विद्यार्थ्यांनी रक्तदान करुन राष्ट्र सेवेमध्ये आपला सहभाग नोंदविला.

या रक्तदान शिबिराचे उद्घाटन शिव छत्रपती शिक्षण संस्थेचे सदस्य डॉ.शिवाजीराव सुर्यवंशी यांच्या हस्ते झाले. तर भालचंद्र ब्लड बँकेचे संचालक डॉ.रामचंद्रराव पाटील आवर्जून उपस्थित होते.

**०९. लोकमान्य टिळक पुण्यतिथी व अण्णाभाऊ साठे जयंती :**

दि.०१ऑगस्ट,२०१६ रोजी रा.से.यो. विभागाच्यावतीने लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांची पुण्यतिथी व साहित्यिक आण्णाभाऊ साठे यांची जयंती साजरी करण्यात आली. सदरील कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ.एस.डी.साळुंके होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून उपप्राचार्य डॉ.एम.एच.गव्हाणे व प्रा.डॉ.विजयकुमार करजकर हे होते. पाहुण्यांनी लोकमान्य टिळक व अण्णाभाऊ साठे यांच्या कार्यावरती विद्यार्थ्यांना बहुमोल मार्गदर्शन केले.

**१०. स्वातंत्र्य दिन:**

दि.१५ ऑगस्ट, २०१६ रोजी महाविद्यालयाच्या प्राणंगणात स्वातंत्र्य दिन साजरा करण्यात आला. याप्रसंगी संस्थेचे सदस्य मा.श्री. गोपाळ शिंदे यांच्याहस्ते ध्वजारोहण करण्यात आला. याप्रसंगी शिव छत्रपती शिक्षण संस्थेचे अध्यक्ष, उपाध्यक्ष, सचिव, सहसचिव व सर्व सदस्य मोठ्या प्रमाणात सहभागी झाले होते.

**११. जोडो भारत अभियान कवठा येथील सेवा ग्रामात आयोजित केलेल्या उपक्रमात सहभाग:**

मौजे कवठा येथील सेवा ग्रामात मा.विनायकराव पाटील यांच्या कल्पनेतून आयोजित केलेल्या भारत जोडो अभियानात दि.१५ ऑगस्ट, २०१६ रोजी राजर्षी शाहू महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्यावतीने कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालयातील स्वंयसेवकांनी कवठा येथील सेवा ग्रामात १८ ते २० स्वंयसेवकांनी सहभाग नोंदवला.

याप्रसंगी जलपुरुष राजेंद्रसिंह राणा (उत्तर प्रदेश), जिल्हाधिकारी श्री पांडुरंग पोले (लातूर) व सेवा ग्रामचे प्रमुख मा.विनायकराव पाटील आणि देशभरातील विविध राज्यांतून आलेले प्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते. याप्रसंगी राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे कार्यक्रमाधिकारी प्रा.विजय ए. गवळी यांनी भारत जोडो अभियान यशस्वी करण्यासाठी परिश्रम घेतले.

**१२. दिशा निर्देशनपर कार्यक्रमाचे आयोजन :**

दि.३१ ऑगस्ट, २०१६ रोजी महाविद्यालयामध्ये रा.से.यो. विभागात निवड झालेल्या स्वंयसेवकांसाठी दिशा निर्देशनपर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी कनिष्ठ महाविद्यालयातील ८० स्वंयसेवक व वरीष्ठ महाविद्यालयातील २४० स्वंयसेवकांनी आपला सहभाग नोंदविला. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एस.डी. साळुंके यांनी भूषविले.

सदरील कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून लातूर जिल्ह्याचे जिल्हा समन्वयक पी.टी. पवार व कनिष्ठ विभागाचे जिल्हा समन्वयक प्रा.संदीप जगदाळे हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. या कार्यक्रमात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन दयानंद कला महाविद्यालयाचे उपप्राचार्य व माजी जिल्हा समन्वयक प्रा.शिवाजी पाटील यांनी बहुमोल मार्गदर्शन केले.

**१३. आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबियांभोवती 'शाहू'ची ओंजळ :**

राजर्षी शाहू महाविद्यालय, लातूर व राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्यावतीने आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या १०

कुटुंबियांना प्रत्येकी १०,००० हजारांचा धनादेश देऊन दिलासा दिला.

दि.०५ सप्टेंबर, २०१६ शिक्षक दिनाचे औचित्य साधून शिव छत्रपती शिक्षण संस्थेचे अध्यक्ष मा.खा.डॉ.गोपाळराव पाटील, उपाध्यक्ष डॉ.पी.आर. देशमुख, सचिव ॲड.नारायणराव पाटील, सहसचिव प्राचार्य अनिरुद्ध जाधव, संस्था सदस्य प्रा.एम.एस. देशमुख, प्राचार्य व सदस्य डॉ.आर.एल.कावळे यांच्या हस्ते आत्महत्याग्रस्त १० कुटुंबियांना प्रत्येकी १०,००० रुपयांचा धनादेश देण्यात आला.

या हृदयद्रावक प्रसंगी उपप्राचार्य डॉ.एम.एच.गव्हाणे सर व बी.टेकचे मुख्य समन्वयक डॉ.विश्वास शेंबेकर यांनी आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटूंबातील दोन अनाथ मुलींना दत्तक घेवून त्यांच्या शिक्षणाची जबाबदारी स्वीकारुन मानवतावादाचा मूलमंत्र दिला. तर याप्रसंगी कार्यक्रमाधिकारी डॉ.कल्याण सावंत यांच्या मातोश्री श्रीमती अनसूयाबाई धोंडिबा सावंत यांनी धोंडिबा सावंत यांच्या स्मरणार्थ वनस्पतीशास्त्र विषयात प्रथम येणाऱ्या विद्यार्थ्यास प्रोत्साहनपर सुवर्णपदक देण्यासाठी (५०,०००/-रु.) पन्नास हजार रुपयांचा धनादेश संस्थेकडे सुपूर्द केला. याप्रसंगी संस्था सदस्य श्री.गोपाळ शिंदे, श्री.शिवाजी भोसले, श्री.आनंद माने, डॉ.सुहास गोरे, श्री. महादेव मुळे, प्रा.प्रकाश देशमुख, श्री.मकरंद देशमुख, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एस.डी.साळुंके, उपप्राचार्य डॉ.पी.एन.सगर, उपप्राचार्य डॉ.महादेव गव्हाणे, आदि मान्यवर उपस्थित होते.

**१४. एड्स बाधितांना शाहू महाविद्यालयाचा मदतीचा हात :**

मौजे हासेगाव येथील एड्स बाधित सेवालयास दि.१७ सप्टेंबर, २०१६ रोजी मराठवाडा हैद्राबाद मुक्तिसंग्राम दिनाचे औचित्य व स्वामी रामानंद तीर्थ वर्धापन दिनाचे औचित्य साधून राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्यावतीने सेवालयाचे प्रमुख श्री प्रा. रवि बापटले यांच्याकडे ८,२००/- रुपयांचा निधी प्राचार्यांच्या हस्ते व उपप्राचार्य डॉ.एम.एच.गव्हाणे यांच्या हस्ते सुपूर्द करण्यात आला. याप्रसंगी माजी समन्वयक प्रा.विजय दळवी, कार्यक्रमाधिकारी डॉ.कल्याण सावंत, डॉ.पुष्पलता कावळे, प्रा.श्रीहरी तलवारे, प्रा.विजय गवळी आणि इतर प्राध्यापक मोठ्या संख्येने उपस्थित होते. याप्रसंगी सेवालयातील विद्यार्थ्यांना खाऊ व शालेय साहित्य कंपास, पेन इत्यादीचे वाटप करण्यात आले. ही निधी संकलित करण्यासाठी व सेवालयास सदिच्छा भेट देण्यासाठी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ.एम.एच.गव्हाणे सर, कार्यक्रमाधिकारी प्रा.डॉ.कल्याण सावंत, कार्यक्रमाधिकारी प्रा.विजय गवळी, कार्यक्रमाधिकारी प्रा.श्रीहरी तलवारे यांनी पुढाकार घेतला. तर विद्यार्थी प्रतिनिधी रवी घुले, संध्या कोनाळे, ईश्वर इंगळे, अमोल गेजगे, महेश मुंडे, श्रद्धा सूर्यवंशी, बुके शिवानंद, सचिन लांबोटे, विकास जगताप, मंगेश शिवणखेडकर, गिरी पवन, राधा जाधव, कल्पना फरकांडे, सुशील सुरवसे, प्रिती मलवाडे इत्यादींनी सहकार्य केले.

**१५. राष्ट्रपिता महात्मा गांधीजी जयंती (स्वच्छ भारत अभियान):**

दि.०२ ऑक्टोबर, २०१६ रोजी रा.से.यो. विभागाच्यावतीने महाविद्यालयामध्ये राष्ट्रपिता महात्मा गांधी जयंती साजरी करण्यात आली. याबरोबरच महाविद्यालयात प्राचार्यांच्या नेतृत्वाखाली स्वच्छता अभियान राबविण्यात आले.

महाविद्यालयाच्या प्राणंगणात विद्यार्थी व स्वंयसेवक यांना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एस.डी. साळुंके यांनी स्वच्छतेची शपथ दिली. यानंतर स्वंयसेवकांनी महाविद्यालयाचा परिसर व वर्ग खोल्यांची स्वच्छता केली. यामध्ये राष्ट्रीय सेवा योजनेच्या कनिष्ठ विभागाचे ३० ते ४० विद्यार्थी व वरिष्ठ विभागाचे १५० ते २०० स्वंयसेवकांनी भाग घेतला.

राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वंयसेवक विद्यार्थी व विद्यार्थीनी प्रतिनिधी अनुक्रमे रवी घुले, संध्या कोनाळे, माधुरी जगताप, रुपाली गट्टे, अमोल गेजगे, अजय कांबळे, ईश्वर इंगळे, राधा जाधव, सुशिल सुरवसे, सुरनार माधव, मलवाडे

प्रीती, सोनाली डोणगावे व कनिष्ठ व वरीष्ठ महाविद्यालयातील बहुसंख्य विद्यार्थ्यांनी हिरीरीने सहभाग नोंदवला.

**१६. वनसहलीचे आयोजन :**

महाविद्यालयाच्या रा.से.यो. विभागाच्यावतीने दि.०२ ऑक्टोबर, २०१६ रोजी अंबाचौंडी, किल्ले धारुर, मुकुंदराज, बुट्टेनाथ, हत्तीखाना, नागनाथ जि.बीड इत्यादी ठिकाणी वनसहलीचे आयोजन करण्यात आले होते. सदरील वनसहलीस महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एस.डी. साळुंके व उपप्राचार्य डॉ.महादेव एच. गव्हाणे यांनी शुभेच्छा दिल्या. प्रारंभी किल्ले धारुर येथील ग्रामस्थांच्या व युथ क्लबच्यावतीने केलेल्या सामाजिक कार्याची पाणी साठवण तलावाचे अवलोकन केले. या संदर्भातली माहिती युथ क्लबच्या सदस्यांनी श्रमदानातून कोणतेही मोठे यश साध्य करता येते हा मूलमंत्र आमच्या स्वंयसेवकांना दिला. या वनसहलीमध्ये कनिष्ठ महाविद्यालयातील ६८ विद्यार्थ्यांपैकी ३५ मुले व ३३ मुली सहभागी झाल्या. तर वरिष्ठ महाविद्यालयातील १२५ स्वंयसेवकांनी सहभाग नोंदविला होता.तद्नंतर धारुर येथील ऐतिहासिक भूईकोट किल्ल्याकडे प्रस्थान करण्यात आले.

**१७. उपप्राचार्य डॉ.महादेव गव्हाणे यांना राष्ट्रीय आदर्श शिक्षक पुरस्कार :**

कोल्हापूर येथील अविष्कार या सामाजिक व शैक्षणिक संस्थेचा २०१६ चा राष्ट्रीय आदर्श पुरस्कार येथील राजर्षी शाहू महाविद्यालयाचे उपप्राचार्य व कार्यक्रम अधिकारी डॉ.महादेव गव्हाणे यांना घोषित करण्यात आला. जागतिक शिक्षक दिनानिमित्त देशातील ३० शिक्षकांना हा पुस्कार जाहीर झाला असून २३ ऑक्टोबर, २०१६ रोजी अतिगरे येथील संजय घोडावत इंटरनॅशनल स्कूल ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर मध्ये पुरस्काराचे वितरण संपन्न झाले. यानिमीत्त त्यांचा राष्ट्रीय सेवा योजनाच्या वतीने सत्कार करण्यात आला.

**१८. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनी भावपूर्ण अभिवादन:**

महाविद्यालयात डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त दि.०६ डिसेंबर, २०१६ रोजी भावपूर्ण अभिवादन सभेचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एस.डी.साळुंके, उपप्राचार्य डॉ.पी.एन.सगर, उपप्राचार्य डॉ.एम.एच.गव्हाणे, पर्यवेक्षक के.ए. कांबळे, कार्यक्रमाधिकारी प्रा.डॉ.कल्याण सावंत, प्रा.डॉ.पी.जी.कावळे, प्रा.श्रीहरी एम. तलवारे, प्रा.विजय ए.गवळी व राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वंयसेवक मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

याप्रसंगी डॉ.आंबेडकरांच्या प्रतिमेस उपप्राचार्य डॉ.पी.एन. सगर सर यांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

**१९. जागतिक मानवी हक्क दिन :**

राजर्षी शाहू महाविद्यालयातील रा.से.यो.च्या वतीने दि.१० डिसेंबर, २०१६ रोजी जागतिक मानवी हक्क दिन साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ.एस.डी.साळुंके तर प्रमुख पाहुणे म्हणून ज्येष्ठ पत्रकार अमर हबीब यांची उपस्थिती होती.

यावेळी उपप्राचार्य डॉ.एम.एच.गव्हाणे यांना राष्ट्रीय आदर्श शिक्षक पुरस्कार तर प्रा.डॉ.विजयकुमार करजकर यांना नेशन बिल्डर अवॉर्ड पुरस्कार मिळाल्याबद्दल प्रमुख पाहुणे अमर हबीब यांच्या हस्ते शॉल श्रीफळ व पुष्पगुच्छ देवून सत्कार करण्यात आला.

**२०. पोलिस रेझिंग डे सप्ताह :**

दि.०२ जानेवारी, २०१७ रोजी लातूर जिल्हा पोलीस विभागाच्यावतीने पोलीस रेझिंग डे सप्ताहाचे आयोजन करण्यात आले होते. सदरील सप्ताहामध्ये राजर्षी शाहू महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वंयसेवकांनी मोठ्या

प्रमाणात सहभाग नोंदवला. लातूर जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक डॉ.शिवाजी राठोड यांनी हिरवा ध्वज फडकावून रॅलीचे उद्घाटन केले. तर पोलीस मुख्यालयापासून ही रॅली निघून गांधी चौक पोलीस स्टेशन लातूर येथे रॅलीचा समारोप करण्यात आला. या समारोप प्रसंगी पोलीस उपअधिक्षक श्री मंगेश चव्हाण यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. तर कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन गांधी चौक पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक श्री गजानन भातलंवडे यांनी केले.

**२१. क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती :**

दि.०३ जानेवारी, २०१७ रोजी क्रांतिज्योती आद्यशिक्षिका सावित्रीबाई जोतीबा फुले यांची जयंती राजर्षी शाहू महाविद्यालयात रा.से.यो. विभागाच्यावतीने साजरी करण्यात आली.

याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एस.डी. साळुंके सर अध्यक्षस्थानी उपस्थित होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून महाराष्ट्र राज्य महिला आयोगाच्या माजी सदस्या श्रीमती आशाताई भिसे लाभल्या होत्या. याप्रसंगी विद्यार्थीनीना आधुनिक काळात येणाऱ्या समस्यावर मात करण्याचा मुलमंत्र त्यांनी दिला. तर स्त्री जीवनात शिक्षणाचे महात्म किती महत्त्वपूर्ण आहे हे पटवून सांगितले.

**२२. रस्ता सुरक्षा अभियान :**

पोलीस वाहतूक नियंत्रण शाखा लातूरच्या वतीने व राजर्षी शाहू महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्यावतीने दि.०९ जानेवारी,२०१७ ते दि.२३ जानेवारी, २०१७ या कालावधीमध्ये रस्ता सुरक्षा अभियान पंधरवाडा राबविण्यात आला. याप्रसंगी वाहतूक नियंत्रण शाखेचे पोलीस उपनिरीक्षक श्री भूमे साहेब यांनी महत्त्वाची भूमिका पार पाडली. या रस्ता सुरक्षा अभियानाचे उद्घाटन पोलीस उपअधीक्षक श्री मंगेश चव्हाण व उपप्राचार्य डॉ.एम.एच.गव्हाणे यांनी केले.

**२३. जागतिक युवा दिन :**

राजर्षी शाहू महाविद्यालय, लातूर व राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्यावतीने दि.१२ जानेवारी, २०१७ रोजी राजमाता जिजाऊ जयंती व स्वामी विवेकानंद जयंती (युवा दिन) मोठ्या प्रमाणात साजरा करण्यात आला. याप्रसंगी राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वंयसेवकांनी मोबाईलचा वापर व गैरवापर यावर आधारित पथनाट्याचे सादरीकरण करुन तरुण पिढीला सूचक संदेश दिला.

या पथनाट्यात स्वंयसेवक रवीना मोरे, अश्विनी बोरसुरे, अनिता फड, प्राची भोसले, शुभांगी कांबळे, संबोधी गायकवाड यांनी सहभाग घेतला.

**२४. प्रजासत्ताक दिन संचलन सहभाग :-**

२६ जानेवारी, २०१७ रोजी मुंबई येथे पार पडलेल्या प्रजासत्ताक दिन संचलन(एस.आर.डी.) सोहळ्यात महाविद्यालयातील खालील तीन स्वंयसेवकांनी सहभाग नोंदवला.

१. श्री. अजय कांबळे

२. अमोल गेजगे

३. कु. रुपाली गट्टे

या यशाबद्दल त्यांचे अभिनंदन शिव छत्रपती शिक्षण संस्थेचे अध्यक्ष मा. डॉ. गोपाळरावजी पाटील साहेब, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एस.डी. साळुंके, उपप्राचार्य डॉ.महादेव गव्हाणे, पर्यवेक्षक प्रा.के.ए.कांबळे, कार्यक्रमाधिकारी प्रा.डॉ.कल्याण सावंत, प्रा.डॉ.पुष्पलता कावळे, प्रा.श्रीहरी तलवारे, प्रा.विजय गवळी यांनी केले.

**२५. प्रजासत्ताक दिन संचलन सोहळा दिल्ली :-** २६ जानेवारी २०१७ रोजी दिल्ली राजपथ येथे पार पडलेल्या प्रजासत्ताक दिन संचलन सोहळ्यात महाविद्यालयातर्फे व स्वा.रा.ती.म. विद्यापीठातर्फे प्रथमच आमच्या महाविद्यालयातील स्वंयसेविका कु. सोनाली संभाजी डोनगावे हीने सहभाग नोंदवला व भारताच्या एन.एस.एस. युनिटचे प्रतिनिधित्व केले. या यशाबद्दल समाजातील सर्वच स्तरातून तिचे अभिनंदन करण्यात आले. लातूर जिल्ह्याचे खा.मा.डॉ. सुनिल गायकवाड, शिव छत्रपती शिक्षण संस्थेचे अध्यक्ष मा. डॉ. गोपाळरावजी पाटील साहेब, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एस.डी. साळुंके, उपप्राचार्य डॉ.महादेव गव्हाणे, पर्यवेक्षक प्रा.के.ए.कांबळे, कार्यक्रमाधिकारी प्रा.डॉ.कल्याण सावंत, प्रा.डॉ.पुष्पलता कावळे, प्रा.श्रीहरी तलवारे, प्रा.विजय गवळी यांनीही तिचे अभिनंदन केले.

**२६. प्रजासत्ताक दिन संपन्न :**

राजर्षी शाहू महाविद्यालयात व राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्यावतीने ६८ वा प्रजासत्ताक दिन साजरा करण्यात आला. शिव छत्रपती शिक्षण संस्थेचे सदस्य मा.डॉ.अजय जाधव यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. ध्वजारोहणानंतर राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्यावतीने दैनंदिन जीवनात मोबाईलचा वापर व गैरवापर व त्याचे विविध परिणाम या विषयावर आधारित मुक पथनाट्याचे सादरीकरण करण्यात आले. त्यात रविना मोरे, अश्विन बोरसुरे, अनिता फड, प्राची भोसले, शुभांगी कांबळे, संबोधी गायकवाड या विद्यार्थीनींनी सहभाग नोंदवून मोबाईलच्या अति वापरामुळे होणाऱ्या दुष्परिणामाची जाणीव करुन देवून मानवतेचा संदेश दिला. यानतंर राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या कार्यालयात राष्ट्रपिता महात्मा गांधीजी व भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन केले.

**२७. ॲडव्हेन्चर कॅम्प :-**

महाविद्यालयातील स्वंयसेवक श्री. रविकुमार घुले याने अमरावती येथे दि.१८ ते २२ जानेवारी रोजी पार पडलेल्या ॲडव्हेन्चर कॅम्पमध्ये सहभाग नोंदवला कॅम्प उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ

**२८. छत्रपती शिवाजी महाराज जयंती संपन्न :**

राजर्षी शाहू महाविद्यालय, लातूर व राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्यावतीने दि.१९ फेब्रुवारी, २०१७ रोजी सकाळी ९.०० वाजता छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती साजरी करण्यात आली. प्रारंभी छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेचे पूजन प्रा.श्रीमती बिराजदार मॅडम, माधुरी जगताप, सोनाली डोणगावे यांच्या हस्ते करण्यात आले.

याप्रसंगी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ.महादेव गव्हाणे यांनी शिवाजी महाराजांनी अवलंबलेल्या युद्ध नितीत, गनीमीकावा तंत्र, कुशल प्रशासक, जाणता राजा, पर्यावरणाचे संरक्षण आणि संवर्धन करणारा राजा, लोकहितेशी राजा इत्यादी महाराजांच्या कार्यकर्तृत्वावर प्रकाश टाकला.

**२९. शाहू महाविद्यालयाकडून जळीत विद्यार्थीनीला आर्थिक मदतीचा हात :**

राजर्षी शाहू महाविद्यालयातील १२वी कला या वर्गात शिकत असलेली विद्यार्थीनी कु.स्वाती नवनाथ जोगदंड वयवर्ष १७ ही विद्यार्थीनी १० मार्च, २०१७ रोजी १२वी बोर्ड परीक्षा देवून घरी गेली असता घरगुती काम करताना अचानक शरिरावरील कपड्याने पेट घेवून ती ४० ते ४५ टक्के जळाली. तिला लातूरमधील डॉ.विठ्ठल लहाने यांच्या हॉस्पिटलमध्ये उपचारासाठी दाखल करण्यात आले. तिचे मूळगाव बर्दापूर, ता.अंबाजोगाई, जि.बीड हे असून तिचे वडील हयात नसल्यामुळे व तिची आर्थिक परिस्थिती बिकट असल्यामुळे तिची आई लताबाई जोगदंड वयवर्ष ४५ वर्ष या काम करुन कुटूंबाचा उदरनिर्वाह भागवतात. या विद्यार्थीनीची आर्थिक परिस्थिती लक्षात घेवून आणि मानवतावादी दृष्टिकोन ठेवून राजर्षी शाहू महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाने महाविद्यालयातील विद्यार्थी, शिक्षक, प्राध्यापक व शिक्षकेत्तर

कर्मचाऱ्यांकडून एकूण रक्कम रु.१६,७०८/- (अक्षरी सोळा हजार सातशे आठ रु.) मदत निधी गोळा करुन तिच्या उपचारासाठी तिचे नातेवाईक श्री अरुण गवळी यांच्याकडे सदरील रक्कम सुपूर्द केली. व ती लवकरात लवकर आपल्या आजारातून बरी व्हावी अशी शुभेच्छा महाविद्यालयाच्यावतीने देण्यात आली.

३०. **शाहूश्री पुरस्कार :**

महाविद्यालयाच्यावतीने दरवर्षी विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या अभ्यासाबरोबरच सर्व उपक्रमात सक्रिय सहभाग नोंदविणाऱ्या अष्टपैलू विद्यार्थ्यांची निवड 'शाहूश्री' पुरस्कारासाठी केली जाते. या वर्षीचा 'शाहूश्री' पुरस्कार महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एस.डी.साळुंके यांनी बी.ए.तृतीय वर्षाची व राष्ट्रीय सेवा योजनेची स्वंयसेवक विद्यार्थीनी कु.माधुरी जगताप हिला जाहीर केला. प्रमुख पाहुणे मा.आमदार विक्रम काळे व मान्यवरांचे हा पुरस्कार तिला प्रदान करण्यात आला.

प्राचार्य
राजर्षी शाहू महाविद्यालय
लातूर

**कार्यक्रमाधिकारी** **प्राचार्य**

# राजर्षी शाहू महाविद्यालय, लातूर

(स्वायत्त महाविद्यालय)

# राष्ट्रीय सेवा योजना

# विशेष युवक शिबीर

## मौजे. वंजारवाडी, ता. रेणापूर, जि. लातूर

2016-17

# राजर्षी शाहू महाविद्यालय, लातूर

## राष्ट्रीय सेवा योजना

## विशेष युवक शिबिर अहवाल (2016-17)

## दि. २३ फेब्रवारी, २०१७ ते ०१ मार्च, २०१७

## शिबिरासाठीचे गाव - मौजे वंजारवाडी, ता. रेणापूर जि.लातूर

**युवक शिबिर :**

राजर्षी शाहू महाविद्यालय, लातूर राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्यावतीने मौजे वंजारवाडी ता.रेणापूर, जि.लातूर येथे **'विशेष युवक शिबिर'** आयोजित करण्यात आले होते. **'पर्यावरण - जलव्यवस्थापन व स्वच्छ भारत, सुंदर भारत यासाठी विशेष युवक शिबिर'** असे घोषवाक्य निश्चित करण्यात आले होते. हे शिबिर **मौजे वंजारवाडी, ता.रेणापूर, जि.लातूर येथे दि.२३ फेब्रवारी, २०१७ ते ०१ मार्च, २०१७** या कालावधित संपन्न झाले. शिबीरामध्य 125 विद्यार्थी (   मुले +   मुली ), 3 कार्यक्रम अधिकारी व 03 कर्मचारी उपस्थित होते. या शिबीर कालावधीमध्ये पुढील उपक्रम घेण्यात आले.

**०१. उद्‌घाटन कार्यक्रम :**

राष्ट्रीय सेवा योजनेच्या 'विशेष युवक शिबिरा'चे उद्‌घाटन कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून शिव छत्रपती शिक्षण संस्थेचे अध्यक्ष मा.डॉ.गोपाळरावजी पाटील होते. तर उद्‌घाटक म्हणून जन्मताच एच.आय.व्ही. बाधीत मुलांचे सेवालय हासेगांव, ता.औसा,जि.लातूर येथील प्रमुख प्रा.रवी बापटले लाभले होते. या शिबिराच्या उद्‌घाटन कार्यक्रमप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एस.डी.साळुंके, उपप्राचार्य डॉ.पी.एन.सगर, उपप्राचार्य डॉ.महादेव गव्हाणे, उपप्राचार्या सौ.एम.एम. दुरुगकर, पर्यवेक्षक प्रा.कल्याण कांबळे, राष्ट्रीय सेवा योजनेचे जिल्हा समन्वयक व दयानंद कला महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा.शिवाजीराव पाटील, रा.से.यो.चे विभागीय समन्वय प्रा.संदीप जगदाळे, रा.से.यो.चे कार्यक्रमाधिकारी प्रा.डॉ.कल्याण सावंत, प्रा.डॉ.पुष्पलता कावळे, प्रा.श्रीहरी एम. तलवारे, प्रा.विजय ए. गवळी, प्रा. चेतना अहाळे, वंजारवाडी गावचे सरपंच श्री सूर्यकांत मुंडे, उपसरपंच सौ.अल्का मुंडे, पोलिसपाटील श्री सीताराम केदार, ग्रामसेविका सौ.राधा भारती, तलाठी विष्णू तिडके, ग्रामपंचायत सदस्य गोविंद मुंडे, जि.प.शाळेचे मुख्याध्यापक श्री विजय परकंडवार, शालेय समितिचे अध्यक्ष बाबू मुंडे, ग्रामपंचायत कर्मचारी सुरेश काटे, ग्रामपंचायत सदस्या सौ.कौशल्या मुंडे, ज्येष्ठ नागरिक बाळाजी मुंडे, शिवाजी मुंडे, गोविंद मुंडे, माणिक मुंडे, गावकरी व शिबिरार्थी स्वंयसेवक मोठ्या संख्येने उपस्थित होते. हे विशेष युवक शिबिर यशस्वी पार पाडण्यासाठी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ.एम.एच.गव्हाणे, कार्यक्रमाधिकारी डॉ.के.डी. सावंत, प्रा.डॉ.पी.जी.कावळे, प्रा.श्रीहरी एम. तलवारे, प्रा. विजय ए. गवळी, प्रा.सौ.चेतना अहाळे, श्री.महेश बिडवे, माधुरी जगताप, रवी घुले, अजय कांबळे, राजू मुंडे, रागिनी वल्लमपल्ले, सुशिल सरवदे, मलवाडे प्रिती इत्यादींनी मोलाचे परिश्रम घेतले. तर महाविद्यालयाचे डॉ.एस.डी. साळुंके यांच्याबरोबरच शिबिराच्या कालावधीमध्ये महाविद्यालयातील अनेक विभागाच्या प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी, माजी विद्यार्थी यांनी सदिच्छा भेट देवून शिबिरास शुभेच्छा दिल्या. तर गणित विभागाचे प्रमुख प्रा.महेश वावरे यांनी स्वत:हाची फोर व्हिलर वाहतुकीसाठी देवून मोलाचे सहकार्य केले. याशिवाय

सुक्ष्मजीवशास्त्र विभागाचे प्रयोगशाळा परिचर श्री दत्ता पिटले यांनी शुध्द, स्वच्छ, निर्मळ (आर.ओ.फिल्टर) पाणी पुरवठा करुन आरोग्याची काळजी घेतली. सदरील शिबिरास ५० विद्यार्थी, ०२ कार्यक्रमाधिकारी (प्रा.श्रीहरी एम.तलवारे व प्रा.विजय ए. गवळी) व ०२ सेवक (श्री गोणे व श्री सत्यपाल येलगट्टे) सहभागी झाले होते. सदरील विशेष युवक शिबिरात खालील विविध उपक्रम राबविण्यात आले.

**०२. स्वच्छता अभियान व श्रमदान :**

शिबिरातील स्वंयसेवकांनी व कार्यक्रमाधिकाऱ्यांनी जि.प. प्राथमिक विद्यामंदिर मौजे वंजारवाडी, ता.रेणापुर, जि.लातूर या शाळेचा परिसर स्वच्छ केला. हगदारीमुक्त गाव व्हावे म्हणून ३० ते ३५ सुलभ शौचालयासाठी खड्डे खोदण्यात आले. याप्रसंगी जनजागृती फेरी आणि बौध्दिक उद्‌बोधनाचे कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले तसेच मौजे वंजारवाडी येथील विशेष युवक शिबिरास लातूर जिल्हाचे खासदार मा.डॉ.सुनिल गायकवाड यांनी शिबिर स्थळास सदिच्छा भेट दिली.

**०३. सांस्कृतिक कार्यक्रम :**

विशेष युवक शिबिरा दरम्यान दररोज रात्री समाजप्रबोधनपर आधारित विविध सांस्कृतिक कार्यक्रमाचे सादरीकरण करण्यात आले. यात ग्रामस्वच्छता व अंधश्रद्धा निर्मुलनाचे महत्त्व या विषयांना प्राधान्य देण्यात आले तसेच सांस्कृतिक कार्यक्रमाचे औचित्य साधून आठ ते दहा किलो मिठाईचे वाटप केले व विशेष युवक शिबिराला शुभेच्छा दिल्या. याबरोबरच ग्रामस्थांच्या मनात सामाजिक, वैज्ञानिक आणि धर्मनिरपेक्ष जागृती घडवून आणण्यास प्रोत्साहन दिले.

**०४. वृक्ष पुनरुज्जीवन उपक्रम राबविला :**

महाविद्यालयाच्या स्वंयसेवकांनी मौजे वंजारवाडी या गावी खामगांव पाटी ते वंजारवाडी दरम्यान वन विभागाने व ग्रामपंचायतीच्या सहकार्याने रस्त्याच्या दुतर्फा, रोप लागवड करण्यात आली.

**०५. तलाव खोलीकरण व गाळ उपसा उपक्रम राबविला :**

मौजे वंजारवाडी येथील तलावाचे ग्रामस्थांच्या सहकार्याने स्वंयसेवकांनी तलाव खोलीकरणाचा उपक्रम प्रभावीपणे राबविला. तलावातील गाळउपसा मोठ्या प्रमाणात करुन जलसाठा करण्याची सोय ग्रामस्थांना करून देण्यात आली. या उपक्रमाप्रसंगी मौजे वंजारवाडी येथील सरपंच श्री सुर्यकांत मुंडे, बाळासाहेब मुंडे, राजू मुंडे व गावातील ग्रामस्थांनी उत्स्फूर्तपणे स्वंयसेवकांना सहकार्य केले.

**०६. वृक्ष दिंडीचे आयोजन :**

राष्ट्रीय सेवा योजनेच्या विशेष युवक शिबिराच्या समारोप प्रसंगी दि.०१ मार्च, २०१७ रोजी सकाळी १०.०० वाजता मोठ्या प्रमाणात पाहुण्यांच्या, ग्रामस्थांच्या व स्वंयसेवकांच्या सहभागातून वृक्ष दिंडी काढण्यात आली. पालखीमध्ये रोपवाटीका ठेवून प्रमुखपाहुणे संस्थेचे सहसचिव मा.डॉ.दि.बा. गोरे व महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एस.डी.साळुंके यांच्या शुभहस्ते वृक्षदिंडीची सुरुवात करण्यात आली.

**07. महिला मेळावा :**

शिबीराच्या तिसऱ्या दिवशी महिला मेळावा आयोजित करण्यात आला होता या मेळाव्यास गावातील 30-100 महिला उपस्थित होत्या सौ.मंदाकीनी मुंडे,प्रा.डॉ.अनुजा जाधव, प्रा.एम.ए. शिंदे, प्रा.अहळे,प्रा.पी.जी.कावळे व जे.एम.जाधव यांनी उपस्थित महिलांना मार्गदर्शन केले. शौचालयाचा वापर महिला सुरक्षा याबाबत त्यांना उदबोधित करण्यात आले.

**08. अंधश्रध्दा निर्मुलपर कार्यक्रम :**

रोजी प्रा.ओमप्रकाश मदनसुरे याचां कार्यक्रम आयोजित केला या कार्यक्रमात त्यांनी गावकऱ्यांना ग्रामस्वच्छतेचे महत्त्व पटवून सांगीतले तसेच अंधश्रध्द्ा निर्मूलनासाठी प्रात्यक्षीकपर प्रबोधन केले.

**09. वृक्षारोपण :**

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, ग्राम पंचायत कार्यालय, घरासमोर या सार्वजनिक ठिकाणी खड्डे खोदुन वृक्षारोपण करण्यात आले. त्याचबरोबर काही घरासमोर, मोकळ्या पटांगणात वृक्ष लावण्यात आले.

**10. ग्राम स्वच्छता :**

शिबीराच्या पहिल्या प्रारंभी जिल्हा परिषद प्राथमिक शाळेचा परिसर स्वच्छ केला. याखेरीज रोज गावातील इतर परिसर शिबीरार्थ्यांनी स्वच्छ केला.

**11. बौद्धिक कार्यक्रम :**

शिबीर काळात दररोज दुपारी 1.00 ते 4.00,3.30 ते 5.00 या वेळात बौद्धिक कार्यक्रम घेण्यात आले. यामध्ये महाविद्यालयाच्या, लोककला, पर्यावरण समतोल, ग्रामीण विकासास यूवकांची व्यक्तीमत्त्व विकास या विषयावर अनुक्रमे श्री उद्धव फड, श्री सय्यद सर, श्री गजानन भातलवंडे, प्रा. डॉ. शिवानंद बोकडे, यशवंत महाविद्यालय, नांदेड, प्रा.डॉ.संभाजी पाटील आदी व्याख्यात्यांनी विविध विषयावर मार्गदर्शन केले.

**१२. समारोप :**

दि.०१ मार्च, २०१७ रोजी राजर्षी शाहू महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या विशेष युवक शिबिराचा (बुधवार) मौजे वंजारवाडी येथे मोठ्या थाटामाटात समारोप करण्यात आला.

या समारोप कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून शिव छत्रपती शिक्षण संस्थेचे सहसचिव डॉ.दि.बा.गोरे हे होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून लातूर ग्रामीण मतदार संघाचे आमदार मा.ना.त्र्यंबक नानासाहेब भिसे लाभले होते. या विशेष युवक शिबिराच्या समारोप समारंभाचे प्रास्ताविक राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी प्रा.श्रीहरी एम. तलवारे यांनी केले. प्रारंभी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एस.डी.साळुंके व उपप्राचार्य डॉ.एम.एच.गव्हाणे यांनी राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्यावतीने सन २०१४-१५, सन २०१५-१६ व सन २०१६-१७ या कालखंडामध्ये विविध उपक्रम राबविले गेले. महाविद्यालयाने उपक्रम राबविल्यामुळे मौजे धानोरी, ता.जि.लातूर या गावांला निर्मलग्राम पुरस्कार मिळाला. तर २०१५-१६ व २०१६-१७ मध्ये वंजारवाडी दत्तक गांव घेवून वेगवेगळे उपक्रम राबविल्यामुळे हे गाव आदर्श ग्राम, स्वच्छ ग्राम व निर्मल ग्राम पुरस्कारासाठी पात्र ठरेल असे भाकित केले.

या निरोप समारंभाच्याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एस.डी.साळुंके, डॉ.एम.एच.गव्हाणे, श्री वैजनाथ लोखंडे (गटविकास अधिकारी पंचायत समिती, रेणापुर), श्री उद्धवजी फड (जनसंपर्क अधिकारी जि.प., लातूर), श्री सुधाकर तेलंग (विस्तार अधिकारी पंचायत समिती, रेणापुर), श्री ललितकुमार शाह (सभापती कृषी उत्पन्न बाजार समिती, लातूर), सुधीर गोजमगुंडे, सौ.राधा भारती (ग्रामसेविका मौजे वंजारवाडी), सूर्यकांत भाऊराव मुंडे (सरपंच, वंजारवाडी), श्री बाळासाहेब मुंडे, प्रा.डॉ.अनुजा जाधव, प्रा.शिंदे मॅडम, कार्यक्रमाधिकारी प्रा.डॉ.के.डी.सावंत, प्रा.डॉ.पी.जी.कावळे,

प्रा.एस.एम.तलवारे, प्रा.व्ही.ए.गवळी, दक्षनागरीक महेश बिडवे, इतर प्राध्यापक, ग्रामस्थ व राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वंयसेवक उपस्थित होते.

निरोप समारंभाच्या प्रसंगी शिबिरार्थी स्वंयसेवकांनी सात दिवसीय शिबिरात जे विविध अनुभव आले. त्याचे प्रमुख पाहुणे व ग्रामस्थांच्यासमोर कथन केले. हे शिबिर यशस्वीपणे पार पाडण्यासाठी राजीव मुंडे, रवी घुले, शिवाजी मुंडे, माणिक घुगे, बाळासाहेब मुंडे, सरपंच सुर्यकांत मुंडे यांनी मोलाचे सहकार्य केले.

प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते उपप्राचार्य डॉ.एम.एच.गव्हाणे व कार्यक्रमाधिकारी यांना ग्रामस्थांनी राष्ट्रपुरुष छत्रपती शिवाजी महाराजांची प्रतिमा भेट दिली. हे शिबिर यशस्वी पार पाडण्यासाठी कार्यक्रमाधिकारी, विभागीय समन्वयक उपप्राचार्य डॉ.एम.एच.गव्हाणे, प्रा.श्रीमती चेतना अहाळे, प्रा.डॉ.अनुजा जाधव, प्रा.श्रीमती माशाळकर, प्रा.माधव शेळके, प्रा.ज्ञानेश्वर बनसोडे, प्रा.विकास वाघमारे, प्रा.श्रीमती एम.ए. शिंदे, महाविद्यालयाचे कर्मचारी श्री गोणे, सत्यपाल येलगट्टे, सौ.जयश्री शिंदे यांनी विद्यार्थी व प्राध्यापकांच्या राहण्याची व भोजनाची उत्तम व्यवस्था केली. तर शिबिर संयोजक प्रा.श्रीहरी एम. तलवारे यांनी सर्वांचे आभार मानले.

या कार्यक्रमात शिबिरार्थी स्वंयसेवकांनी केलेल्या ग्रामस्वच्छतेचे निकर्ष लोकांसमोर मांडले. कार्यक्रमाचे आभार प्रा.विजय ए. गवळी यांनी मानले.

स्वा.रा.ती.म.वि. नांदेड, रासेयो विभागीय समन्वयक उपप्राचार्य डॉ. महादेव गव्हाणे, कार्यक्रमाधिकारी डॉ. के.डी. सावंत, कार्यक्रमाधिकारी प्रा.श्रीहरी तलवारे, कार्यक्रमाधिकरी डॉ.पुष्पलता कावळे, कार्यक्रमाधिकरी प्रा. विजय गवळी, विद्यार्थी प्रतिनिधी रवि घुले, विद्यार्थिनी प्रतिनिधी कु. संध्या कोनाळे आदी. रासेयोच्या सर्व कार्यक्रमात परिश्रम घेतात.

✦✦✦✦✦✦

प्राचार्य
राजर्षी शाहू महाविद्यालय
लातूर

**कार्यक्रमाधिकारी** **प्राचार्य**



**Inauguration of Debating Competation on occasion of Birth anniversary of Late Shri Vilasrao Deshmukh Saheb by the precious hands of Honb. Dr. Gopalrao Patil Saheb, Organised by NSS. On this occasion Prin . Dr. S.D.Salunke ,Dr. M.H.Gavane , Dr. K.D.Savant,Dr. P.G.Kawale and others. Date 13/08/2016**




## NSS Volutters participated in Jodo Bharat Abhiyan At Kawatha on 15/08/2016




**Distribution of Rs. 10000 to 10 families of farmers who committed suicide by the hands of Honb. Dr. GopalraoPatil on occasion family members of farmers, Prin . A.S.Jadhav, DR. R.L.Kawale, Dr. S.D.Salunke ,Dr. M.H.Gavane , Dr. K.D.Savant,Dr. P.G.Kawaleand others. Date – 05-09-2016**




N.S.S. Voluteers presented Pathnatya *CHAWADI* carrying message about litaracy dowary system importance of toiletes and tree plantation in college on occasion of Marathwada muktisangram Date: 17-09-16




Fund of Rs. 8700.00 Collected for *SEVALAYA* ,Hasegaon, a home for in born HIV affected childrens and distributed by the hands of Principal Dr. S.D.Salunke on occasion Dr. M.H.Gavane , Dr. K.D.Savant, Prof. S.M.Talware Ravi Ghule and others



Organization of *Van-Sahal* on 04-10-16,at Ambachondi , on this occasion Dr. K.D.Savant, ,
Dr. P.G.Kawale , Prof. S.M.Talware and 200 Students participated




**Avhan-2016 : Four Volunteers of our College Participated in Avhan-2016 at SavitribaiPhule Pune University, Pune**



**200 Students participated in shramdan in college campus**




**On occasion of Death Anniversary of Dr. Babasaheb Ambedkar Vice Principal Dr. P.N.Sagar, PO Dr. K.D.Savant, Dr. P.G.Kawale Shri S.M. Talware and Students**




**Celebration Gandhi Jayanti on 02nd October on this occasion Dr. B.B.Deshmukh, Prof V.J.Dalvi, Prof. M.S.Wawre , PO Dr. K.D.Savant, Dr. P.G.Kawale Shri S.M. Talware and Students**




**Shri. Amar Habib guiding students on occasion oh world human right day on stage Principal Dr. S.D.Salunke , Dr. P.G.Kawale , Dr. K.D.Savant, Prof. S.M.Talware and others**




**Celebration of Annabhau Sthe Jayanti and Lokmanya Tilak Punytithi on 18th Jul on this occasion Vice Principal Dr. P.N.Sagar, PO Dr. K.D.Savant, Dr. P.G.Kawale Shri S.M. Talware and Students**



Visit to *SEVALAYA* ,Hasegaon, a home for in born HIV affected children’s and distributed fruits and educational aids to children’s by the hands Dr. M.H.Gavane on occasion PO Dr. K.D.Savant, Prof. S.M.Talware, Prof. Vijay Dalvi , Vijay Gavali and others




Celabrated Gadge Maharaj Jayanti on this occasion Principal Dr. S.D.Salunke, Prof V.J.Gavali, , PO Dr. K.D.Savant, Dr. P.G.Kawale and Students




Felicitation of the students Shri. Amol Gejage. Miss. Rupali Gutte,and Ajay Kamble for getting selected for SRD camp , Mumbai on this occasion Honb. Prin . A.S.Jadhav, Dr. D.B. Gore, Dr. R.L.Kawale, Principal Dr. S.D.Salunke , Vice Principal Dr. M.H.Gavane , Dr. K.D.Savant and others




**Felicitation of Miss. Sonali Dongave for getting selected for NRD camp , Rajpath, Delhi on this occasion Honb. . Dr. Gopalrao Patil, Principal Dr. S.D.Salunke , Vice Principal Dr. P.N.Sagar, Vice Principal Dr. M.H.Gavane , Dr. K.D.Savant, Dr. P.G. Kawale Prof. S.M.Talware, Prof. Vijay Gavali**



**NSS volunteer Shri. Ravi Ghule participated in National Adventure Camp at Bhandardara**




**150 NSS volunteers participated in Raising Day Reilly organized by police Department, Latur**




**Srimati Ashatai Bhise guiding students on occasion of Savitribai Phule Jayanti on stage Principal Dr. S.D.Salunke , Vice Principal Dr. M.H.Gavane , Dr. K.D.Savant, Dr. P.G.Kawale , Prof. S.M.Talware and others. Date 03-01-2017**





**160 NSS volunteers participated in Rasta Suraksha Abhiyan Reilly organized by police Department, Latur**



**NSS volunteers participated in Weapon training programme jointly organized by Police Department, Latur and NSS Unit RSML**




Felicitation of the students  Miss. Sonali Dongave  for getting selected for NRD camp , Shri. Amol Gejage. Miss. Rupali Gutte,and Ajay Kamble, Dongave  for getting selected for SRD camp on this occasion   Dr. K.D.Savant,  Dr. P.G. Kawale Prof. S.M.Talware,



NSS volunteer Miss. Jgatap Madhuri participated in Avishkar – 2017 at Savitribai Phule Pune University, Pune




N.S.S. Voluteers presented Mime  carrying message about  hardous effects of missuse and over use of mobile phones  in college on occasion of Yuva din   Date: 12-01-17



**NSS volunteer Miss. Sonali Dongave Participated in NRD Camp Rajpath Delhi , 02nd from left in last row with Honb. President of India Shri. Pranab Mukharji at Rastrapati Bhavan Delhi**




**NSS volunteer Miss. Sonali Dongave Participated in NRD Camp Rajpath Delhi with Honb. Prime minister of India Shri. Narendra Modi at Rastrapati Bhavan Delhi**



**Organized Blood Donation Camp on occasion Guru Pornima on 18-7-2017**

**78 unit blood donated by students and staff members**



**Celebrated world womens day 08th March on this occasion Vice Principal Dr. M.H.Gavane , Dr. K.D.Savant, Dr. P.G.Kawale , Prof. S.M.Talware and others and Students**




**Fund of Rs. 16708.00 Collected for *burned student* and financial assistance provided for medical expenditure by the hands Dr. M.H.Gavane , Dr. K.D.Savant, Prof. S.M.Talware Ravi Ghule and others**


राष्ट्रीय सेवा योजना
राष्ट्रीय सेवा योजना + 2
राजकुमार फोटो स्टुडिओ, लातूर


शिवछत्रपती शिक्षण संस्था लातूर.संचलित.
राजर्षी शाहू महाविद्यालय,लातूर (स्वायत्त)
राष्ट्रीय सेवा योजना
पर्यावरण - जलव्यवस्थापन व स्वच्छ भारत,
सुंदर भारत यासाठी विशेष युवक शिबिर
उद्घाटन समारंभ दि. २३ फेब्रुवारी २०१७ समारोप समारंभ दि.१ मार्च २०
मौजे वंजारवाडी ता.रेणापूर जि.लातूर. दि.२३ फेब्रुवारी ते १ मार्च २०१७
शिवछत्रपती शिक्षण संस्था लातूर.संचलित.
राजर्षी शाहू महाविद्यालय,लातूर (स्वायत्त)
राष्ट्रीय सेवा योजना + 2
पर्यावरण - जलव्यवस्थापन व स्वच्छ भारत,
सुंदर भारत यासाठी विशेष युवक शिबिर
उद्घाटन समारंभ दि. २३ फेब्रुवारी २०१७ समारोप समारंभ दि.१ मार्च २०१७
मौजे वंजारवाडी ता.रेणापूर जि.लातूर. दि.२३ फेब्रुवारी ते १ मार्च २०१७
राजकुमार फोटो स्टुडिओ, लातूर


राजकुमार फोटो स्टुडिओ , लातूर


NSS
NSS
राजकुमार फोटो स्टुडिओ , लातूर


राजकुमार फोटो स्टुडिओ, लातूर


राजर्षी शाहू महाविद्यालय,लातूर (स्वायत्त)
राष्ट्रीय सेवा योजना
पर्यावरण - जलव्यवस्थापन व स्वच्छ भारत,
सुंदर भारत यासाठी विशेष युवक शिबिर
राजर्षी शाहू महाविद्यालय,लातूर (स्वायत्त)
राष्ट्रीय सेवा योजना + 2
पर्यावरण - जलव्यवस्थापन व स्वच्छ भारत,
सुंदर भारत यासाठी विशेष युवक शिबिर
उद्घाटन समारंभ दि. २३ फेब्रुवारी २०१७ समारोप समारंभ दि.१ मार्च २०१७
मौजे वंजारवाडी ता.रेणापूर जि.लातूर. दि.२३ फेब्रुवारी ते १ मार्च २०१७
राजकुमार फोटो स्टुडिओ, लातूर


राजकुमार फोटो स्टुडिओ , लातूर


राजर्षी शाहू महाविद्यालय,लातूर (स्वायत्त)
राष्ट्रीय सेवा योजना + 2
पर्यावरण - जलव्यवस्थापन व स्वच्छ भारत,
सुंदर भारत यासाठी विशेष युवक शिबिर
उद्घाटन समारंभ दि. २३ फेब्रुवारी २०१७ समारोप समारंभ दि.१ मार्च २०१७
मौजे वंजारवाडी ता.रेणापूर जि.लातूर. दि.२३ फेब्रुवारी ते १ मार्च २०१७


शिवछत्रपती शिक्षण संस्था लातूर संचालित
राजर्षी शाहू महाविद्यालय, लातूर (स्वायत्त)
राष्ट्रीय सेवा योजना
पर्यावरण - जलव्यवस्थापन व स्वच्छ भारत,
सुंदर भारत यासाठी विशेष युवक शिबिर
राजर्षी शाहू महाविद्यालय, लातूर (स्वायत्त)
राष्ट्रीय सेवा योजना + 2
पर्यावरण - जलव्यवस्थापन व स्वच्छ भारत,
सुंदर भारत यासाठी विशेष युवक शिबिर
राजकुमार फोटो स्टुडिओ, लातूर




जि.प.प्रा.शा.वंजारवाडी
राजकुमार फोटो स्टुडिओ , लातूर


हागणदारी मुक्त
राजकुमार फोटो स्टुडिओ , लातूर


शिवछत्रपती शिक्षण संस्था लातूर,संचलित.
राजर्षी शाहू महाविद्यालय,लातूर (स्वायत्त)
राष्ट्रीय सेवा योजना
पर्यावरण - जलव्यवस्थापन व स्वच्छ भारत,
सुंदर भारत यासाठी विशेष युवक शिबिर
राजकुमार फोटो स्टुडिओ, लातूर

